# नागपूर जिल्हा (ग्रामीण) पोलीस वार्तापत्र
## पोलीस अधिक्षक कार्यालय, नागपूर.


दिनांक 03/08/2023 (गुरूवार) सायंकाळ

---

### नागपूर ग्रामीण जिल्हयाची वाहतुक केसेस बाबत विशेष मोहीम

नागपूर जिल्हा ग्रामीण जिल्हातंर्गत पोलीस स्टेशन मधील वाहतुक नियमन करणारे नियुक्त असलेले अधिकारी/अंमलदार व वाहतुक शाखा तर्फे वाहतुकीचे उल्लंघन करणाऱ्यां विरूध्द निरंतर योग्य ती कार्यवाही करण्यात येते. वाढत्या अपघाताचे प्रमाण विचारात घेता व त्याचे विश्लेषण करून रस्ते अपघातांना आळा घालण्याकरीता अपघातास कारणीभुत ठरणाऱ्या कारणांवर विशेषत: लक्ष देवून त्याव्दारे दि. १/७/२०२३ ते ३१/७/२०२३ पर्यत मोटार वाहन अधिनियम अंतर्गत वेगवेगळया मोहीमा आयोजित करून कारवाई करण्यात आली आहे. अपघातास कारणीभुत ठरणाऱ्यामध्ये मुख्यत: अवैध प्रवासी वाहतूक, विना हेल्मेट, वाहन चालवितांना मोबाईलचा वापर करणे, दारू पिऊन वाहन चालविणे, वेगमर्यादे पेक्षा वाहन चालविणे, विना सिटबेल्टचा वापर करणे ईत्यादी प्रकारच्या शिर्षकाखाली विशेष मोहीम राबवुन खालील प्रमाणे कार्यवाही करून दंड वसुल करण्यात आला आहे.

| Sr. No. | Head | Number of Cases | Fine Amount |
|---|---|---|---|
| 1 | Over Speeding Cases 112/183 | 589 | 1175000 |
| 2 | Breach of Traffic Signal MMVR 239/177 MV | 166 | 90000 |
| 3 | Helmet 129/194 MV | 1805 | 909000 |
| 4 | Clandestine Operation of Caring Passenger 66(1)/192-A | 37 | Court Pending |
| 5 | Seat belt 194(B)(1) | 3916 | 785000 |
| 6 | Drunk & Drive 185MV Act | 244 | Court Pending |
| 7 | Mobile 184(c) MV | 42 | 47000 |
| | **Total** | **6799** | **3006000** |
| 8 | Other Cases | 1381 | 1612350 |
| | **Total Cases & Total Fine** | **4548** | **4618350** |

वरिल शिर्षकाखाली विशेष मोहीम राबवुन नागपूर जिल्हा ग्रामीण जिल्हातंर्गत पोलीस स्टेशन व वाहतुक शाखा तर्फे करण्यात आलेल्या कारवाईमुळे दि. १/७/२०२३ ते ३१/७/२०२३ पर्यत घडलेल्या अपघाताची आकडेवारी पाहता अपघातांना आळा घालण्यास यश प्राप्त झाले आहे.

त्याचप्रमाणे नागपूर ग्रामीण जिल्हा अंतर्गत जिल्हा वाहतुक शाखा मधील रामटेक बिट, काटोल बिट, सावनेर बिट, उमरेड बिट, बोरी बिट व कन्हान बिट तसेच प्रादेशिक परिवहन विभाग यांच्यासह संयुक्तिकरीत्या जिल्हयातील प्राथमिक, माध्यमिक, उच्च माध्यमिक, महाविदयालय येथे होणारी शालेय परिवहन वाहतुकबाबत वापरण्यात येणारी स्कुल बस मार्गदर्शकतत्वा प्रमाणे सुनियमित वाहतुकीसंबंधाने स्कुल बसेसची पडताळणी/त्याचप्रमाणे वाहनाची सर्वकागदपत्रे पडताळणी संबंधाने विशेष मोहीम राबवुन ज्या स्कुल बसचे कागदपत्रे परिपुर्ण आढळुन न आल्यास त्यांच्यावर प्रादेशिक परिवहन अधिकाऱ्या मार्फत योग्य तो दंड आकारण्यात येवुन संबंधीत पोलीस स्टेशन मध्ये वाहन डिटेन करण्यात आले आहे.

सदरची कार्यवाही व त्याचे फलीत यात प्रामुख्याने मा. श्री. विशाल आनंद (भापोसे), पोलीस अधिक्षक नागपूर ग्रामीण, मा. डॉ. संदिप पखाले, अपर पोलीस अधिक्षक, नागपूर ग्रामीण, मा. श्री. विजय माहुलकर, प्रभारी पोलीस उप अधिक्षक (गृह), नागपूर ग्रामीण, यांचे मोलाचे मार्गदर्शन असून त्यांच्या मार्गदर्शनाखाली सहकारी अधिकारी/कर्मचारी यांचे सहभागाने राबविली.

## घरफोडी

**१) पो.स्टे. मौदा** :– अंतर्गत ०१ कि. मी. अंतरावरील हनुमान नगर वार्ड क्र. ६ मौदा येथे दिनांक ०१/०८/२०२३ ते ०३.०० वा. ते दिनांक ०२/०८/२०२३ चे १०.३० वा. दरम्यान फिर्यादी नामे– अविनाश मारोतराव जाने, रा. हनुमान नगर वार्ड क्र. ६ मौदा हा दुधाचा धंदा करतो. फिर्यादीचा दररोज १०० लिटर दुध विक्री असल्याने फिर्यादीचे १० दिवसाचे पैसे ५००००/– रू. आले होते. दि. ०१/०८/२०२३ रोजी दुपारी ३.०० वा. दरम्यान फिर्यादी आपल्या संपुर्ण परिवारासह घराला कुलुप लावून गावी गेले होते व रात्री ईसापूर इथेच थांबले. दि. ०२/०८/२०२३ चे सकाळी १०/३० वा. फिर्यादीला शेजारी नामे– देवाजी भोयर यांचा फोन आला व त्यांनी सांगितले कि तूमच्या घराच्या गेटला लॉक आहे. व घराचा लॉक तुटलेला असून दरवाजा उघडा आहे. अशी माहीती मिळताच फिर्यादी ११. ३० वा. दरम्यान मौदा येथे पोहचले असता घराचे दार उघडे व दाराची कडी कापलेली दिसली. घरातील बेडरूम मधील लोखंडी आलमारीचे लॉकर तुटलेले दिसले व लॉकर मधील सोन्याचे दागिने व रोख रक्कम दिसून आली नाही. दागिन्याचे वर्णन १) एक सोन्याची पोत पावने तिन तोळे ८२०००/–रू. २) सोन्याची पोत अडीच तोळयाची ७५०००/–रू. ३) सोन्याचा गोफ दीड तोळयाचा ४५०००/–रू. ४) रोख रक्कम ५००००/–रू. एकूण किंमत २,५२,०००/–रू. कोणीतरी अज्ञात चोराने चोरून नेला आहे.

सदर प्रकरणी फिर्यादी यांच्या रिपोर्टवरून पो.स्टे. मौदा येथे अज्ञात आरोपीविरुध्द कलम ४५४, ४५७, ३८० भादंवि. कायद्यान्वये गुन्हा नोंद केला आहे. गुन्हयाचा पुढील तपास पोलीस निरीक्षक हेमंतकूमार खराबे मो. क्र. ९८२३४३८३५५ हे करीत आहे.

**२) पो.स्टे. उमरेड** :– अंतर्गत एम आर ट्रेडर्सचे दुकान वासुरकर ले आउट उमरेड येथे दिनांक ०१/०८/२०२३ ते २०.०० वा. ते दिनांक ०२/०८/२०२३ चे ०८.०० वा. दरम्यान फिर्यादी नामे– महफज अहमद वल्द नझीर अहमद, वय ३४ वर्ष, प्लाट नं १२ कळमना चौक कावळापेठ याने आयुर्वेदीक कंपनीत औषधीचा व्यवहार करून त्याची रोख रक्कम बेडरूमध्ये ६००००/– रू. ठेवली होती आणि फिर्यादीच्या हाडवेअरच्या दुकानात ३००००/– रू. ची रोख ठेवले होते. दिनांक ०१/०८/२०२३ चे रात्री ०८/०० वा. दरम्यान दुकान बंद केले व दि. ०२/०८/२०२३ चे ०८/०० वा. दरम्यान दुकान उघडले असता शटरचे कुलुप तुटलेले दिसले असता कपाटात ठेवलेले पैसे व बेडरूममध्ये ठेवलेले पैसे एकुण रक्कम ९००००/– रू. व डी. व्ही. आर किंमती अंदाजे २०००/– रू. असे एकुण ९२०००/– रूपयाचा मुद्देमाल कोणीतरी अज्ञात चोराने चोरून नेला आहे.

सदर प्रकरणी फिर्यादी यांच्या रिपोर्टवरून पो.स्टे. उमरेड येथे अज्ञात आरोपीविरुध्द कलम ४५७, ३८० भादंवि. कायद्यान्वये गुन्हा नोंद केला आहे. गुन्हयाचा पुढील तपास पोलीस उपनिरीक्षक रविंद्र वाघ पोस्टे उमरेड मो. नं. ९९७५८१८४०१ हे करीत आहे.

**३) पो.स्टे. जलालखेडा** :— अंतर्गत ०१ किमी अंतरावर जलालखेडा मेन मार्केट येथे दिनांक ०१/०८/२०२३ चे २१.०० वा. ते दिनांक ०२/०८/२०२३ चे ०८.३० वा. दरम्यान फिर्यादी नामे— शुभम प्रकाश चौधरी, वय ३० वर्ष रा. जलालखेडा हा दिनांक ०१/०८/२०२३ रोजी नेहमीप्रमाणे रात्री दरम्यान ०९.०० वा. दुकानाला बाहेरून कुलुप लावुन घरी गेला व दिनांक ०२/०८/२०२३ रोजी ०८.३० वा. दुकान उघडण्याकरीता आला असता त्याला एका बाजुचे कुलुप लावलेले दिसले नाही व दुसरे बाजुचे कुलुप उघडुन दुकानाचे आत जावुन पाहणी केली असता दुकानातील सर्व सामान अस्तव्यस्त दिसले तसेच दुकानातील एका टेबलच्या ड्रॉपमध्ये ठेवलेले अंदाजे १५००/—रू. तसेच काउंटर ड्रॉपमध्ये ठेवलेले १० रूपयाचे व ५० रूपयाचा नोटा १५०००/— रू तसेच दुकानातील डिव्हीआर मशीन किंमती अंदाजे १५००/— रू. असा एकुण १८०००/— रूपयाचा मुद्देमाल कोणीतरी अज्ञात चोराने चोरून नेला आहे.

सदर प्रकरणी फिर्यादी यांच्या रिपोर्टवरून पो.स्टे. जलालखेडा येथे अज्ञात आरोपीविरुध्द कलम ४५७, ३८० भादंवि. कायद्यान्वये गुन्हा नोंद केला आहे. गुन्हयाचा पुढील तपास पोलीस उपनिरीक्षक मनोज शेंडे पोस्टे जलालखेडा हे करीत आहे.

**पोलीस माहिती कक्ष**
**नागपूर जिल्हा (ग्रामीण), नागपूर**